क्रमांक : ९९

# महाराष्ट्र विधानसभा
# पत्रक भाग - दोन
## गुरुवार, दिनांक ११ ऑगस्ट, २०२२/ श्रावण २०, (१९४४ शके)

संदर्भ :- या सचिवालयाचे पत्रक भाग-दोन क्र.८१, दिनांक २६ मे, २०२२

९९ . **या सचिवालयाच्या संदर्भाधीन पत्रक भाग - दोन मध्ये सुधारणा करुन खालील प्रमाणे सुधारित पत्रक भाग - दोन निर्गमित करण्यात येत आहे.**

विधानसभा कामकाज सल्लागार समितीच्या गुरुवार, दिनांक ११ ऑगस्ट, २०२२ रोजीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार आगामी तृतीय (पावसाळी) अधिवेशन, २०२२ बुधवार, दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ रोजी विधानभवन, मुंबई येथे सुरु होणार आहे. त्यानुसार मा.मंत्री महोदयांना तारांकित प्रश्नांचे उत्तर देण्यासाठी मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी पुढील प्रमाणे सुधारित दिवस नेमून दिले आहेत

तसेच पहिल्या आठवड्यातील तारांकित स्वीकृत प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट शुक्रवार, दिनांक १२ ऑगस्ट, २०२२ रोजी दुपारी १.०० वाजता व त्यापुढील आठवड्यातील तारांकित स्वीकृत प्रश्नांचे बॅलट मंगळवार, दिनांक १६ ऑगस्ट, २०२२ रोजी दुपारी १.०० वाजता उप सचिव/अवर सचिव (समिती) यांच्या दालनात घेण्यात येईल. याबाबतची माहिती पत्रक भाग दोनद्वारे स्वतंत्ररित्या मा.सदस्यांना कळविण्यात येईल. सदरहू बॅलटसाठी मा.सदस्यांना उपस्थित राहता येईल. **परंतु त्यांना प्रवास किंवा दैनिक भत्ता अनुज्ञेय असणार नाही.**

### सुधारित विवरणपत्र

| गट क्र. | गटामध्ये समाविष्ट असलेले मंत्री | पूर्वीच्या उत्तराचा दिनांक | सुधारित उत्तराचा दिनांक |
|---|---|---|---|
| एक | (१) अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री<br>(२) अन्न व औषध प्रशासन मंत्री<br>(३) शालेय शिक्षण मंत्री<br>(४) उच्च व तंत्रशिक्षण मंत्री<br>(५) पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री<br>(६) परिवहन, संसदीय कार्य मंत्री<br>(७) पर्यटन, पर्यावरण व वातावरणीय बदल राजशिष्टाचार मंत्री | * सोमवार, दिनांक १८ जुलै, २०२२<br>* सोमवार, दिनांक २५ जुलै, २०२२ | सोमवार, दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ |
| दोन | (१) मुख्यमंत्री<br>(२) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री<br>(३) गृहनिर्माण, अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री<br>(४) नगरविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री | * मंगळवार, दिनांक १९ जुलै, २०२२<br>* मंगळवार, दिनांक २६ जुलै, २०२२ | मंगळवार, दिनांक २३ ऑगस्ट, २०२२ |
| तीन | (१) उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा मंत्री<br>(२) उर्जा मंत्री<br>(३) इतर मागास बहुजन कल्याण,खार जमिनी विकास, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री<br>(४) आदिवासी विकास मंत्री<br>(५) सहकार, पणन मंत्री<br>(६) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री | बुधवार, दिनांक २० जुलै, २०२२<br>बुधवार, दिनांक २७ जुलै, २०२२ | बुधवार, दिनांक १७ ऑगस्ट, २०२२<br>बुधवार, दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ |

| गट क्र. | गटामध्ये समाविष्ट असलेले मंत्री | पूर्वीच्या उत्तराचा दिनांक | सुधारित उत्तराचा दिनांक |
|---|---|---|---|
| चार | (१) उप मुख्यमंत्री<br>(२) जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री<br>(३) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री<br>(४) ग्रामविकास व कामगार मंत्री<br>(५) वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य मंत्री<br>(६) महिला व बालविकास मंत्री<br>(७) मृद व जलसंधारण मंत्री | गुरुवार, दिनांक २१ जुलै, २०२२<br>गुरुवार, दिनांक २८ जुलै, २०२२ | गुरुवार, दिनांक १८ ऑगस्ट, २०२२<br>गुरुवार, दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ |

(टिप : गट-१ चे * सोमवार, दिनांक १८ जुलै, २०२२ व * सोमवार, दिनांक २५ जुलै, २०२२ या दोन्ही आठवड्याचे प्रश्न एकत्रित करण्यात येऊन सदर प्रश्न दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ रोजी घेण्याचा तसेच गट-२ चे * मंगळवार, दिनांक १९ जुलै, २०२२ व * मंगळवार, दिनांक २६ जुलै, २०२२ या दोन्ही आठवड्याचे प्रश्न एकत्रित करण्यात येऊन सदर प्रश्न दिनांक २३ ऑगस्ट, २०२२ रोजी घेण्याचा निर्णय मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी घेतला आहे.)

विधान भवन,
मुंबई
दिनांक : ११ ऑगस्ट, २०२२

राजेन्द्र भागवत,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा

याची प्रत :

(१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य
(२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
(३) संगणक कक्ष (Website)